भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १३२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०३/२०१८

**१) कॅम्पुटर डिवाईस सामानाची चोरी. :–**

दिनाक ११/०३/२०१८ चे १४.०० ते दिनांक १२/०३/२०१८ चे ०६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी पुरुषोत्तम केवळराम झलके वय ५५ वर्ष, रा. प्रभारी मुख्याध्यापक स्वर्गवासी सुलोचना देवी पारधी विदयालय मोहाडी येथील कोणीतरी अज्ञात चोराने संगनक रुम मधील २ सि. पी. यु जुने, ५ मॉनीटर, ५ माऊस, ५ किबोर्ड, कॅम्पुटींग डिवाईस असा एकुण ६०,५००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.गिन्हेंपुजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी . :–**

दिंनाक ११/०३/२०१८ चे २०.०० ते १२/०३/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अशोक धनराज बावणे वय ३९ वर्ष, रा. नेहरु वार्ड मोहाडी यानी त्याचे राहते घराचे समोर हिरो कंपनीची मोटार सायकल पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु ६५६३ किंमती ३०,०००/–रु. ही लॉक करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.गिन्हेंपुजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**३) दगडाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक १२/०३/२०१८ चे १२.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी विशाल श्रीराम नंदेश्वर वय ४६ वर्ष, रा. धारगाव बाजार चौक हे जागेश्वर वंजारी रा. धारगाव यांचे चहा पाणी दुकानात १२.३० वाजता दरम्यान हजर असता आरोपी हा जिल्हा परिषद सेंटर कडे जातांना दिसला तर फिर्यादीने तेथे हजर असलेले डयुटी वरील होमगार्ड ला आरोपी हा परिक्षा सेंटर कडे कॉपी देण्याकरीता जात आहे असे सांगीतले तर फिर्यादी हा नमुद चहापाण्याच्या दुकानाचे मागे गेला तेव्हा आरोपीने फिर्यादी जवळ जावुन फिर्यादीला तु कॉपी देण्याकरीता जात आहे असे होमगार्ड ला का सांगीतले, असे म्हणुन जमीनी वरील दगड हातात उचलुन फिर्यादीचे डोक्यावर डावे बाजुला कपाळाचे वरचे भागास दगडाने जखमी करुन दुखापत केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक १२/०३/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील आरोपी क्र. १ ही दारु विक्री करीत असतांनी फिर्यादीस दिसुन आल्याने फिर्यादी ही व्यसन मुक्तीची सदस्य असल्याने आरोपी क्र. १ चा हात पकडला असता झटकुन तिन्ही आरोपीतांनी संगनमत करुन सार्वजनीक ठिकाणी अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिल्याने फिर्यादी सौ. पुष्पा लक्ष्मण भांडारकर वय ४० वर्ष, रा. पळसगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**५) महिलेचा उपचारा दरम्यान मृत्यु . :–**

दिंनाक ११/०३/२०१८ चे ०४.४५ वाजता दरम्यान यातील मृतक श्रीमती ताराबाई निलकंठ वैद्य वय ६५ वर्ष, रा. बेलघाटा वार्ड पवनी हिची अचानक प्रकृती बिघडल्याने तिला औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे नेले असता हदय विकाराचा झटका आल्याने तिला डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. बिसने यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत.

**६) विंचुने चावा घेतल्याने उपचारादरम्यान मुलींचा मृत्यु . :–**

दिंनाक १०/०३/२०१८ चे १९.४० वाजता दरम्यान यातील मृतक लुंबीनी लंकेश्वर वासनीक वय ७ वर्ष, रा. चकारा हिने उजवे पायाचे अंगठीला विंचुने चावा घेतला तिला औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे आकस्मित विभागात दिनांक १०/०३/२०१८ ने १९.४० भरती केले असता ती उपचारादरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा मर्ग ००/१८ कलम १७४ जाफौचे कागदपत्र प्राप्त झाल्याने पोहवा. बैस यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पोलीस स्टेशन अडयाळ करीत आहेत.

**७) विषारी औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक ०१/०३/२०१८ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील मृतक दयाराम विठोबा मोहरकर वय ६५ वर्ष, रा. नेरला याने विषारी औषध प्राशन करुन प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता ग्रामीण रुग्नालय अडयाळ येथे भरती असतांना त्याचा प्राथमीक उपचार करुन सामान्य रुग्नालय भंडारा नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे रेफर केले असता उपचारा दरम्यान दिनांक ०४/०३/२०१८ ला मरण पावल्याने पो. स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ १७४ जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. बावनकुळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे पोलीस स्टेशन अडयाळ करीत आहेत.

**८) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक ११/०३/२०१८ चे ११.४० वाजता दरम्यान यातील मृतक धर्मराज गंगाराम पाटील वय ५२ वर्ष, रा. डोंगरी बु. माईल्स हा उपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे नेत असतांनी हार्ट अटॅक येवुन मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. निखाडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ढिल्हारे पोलीस स्टेशन गोबरवाही करीत आहेत.

**९) अवैध देशी दारु/जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक १२/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन करडी व तुमसर येथे अवैध देशी दारु / जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २५ लिटर हातभट्टी दारु किंमती २५००/–रु. तसेच जुगारातुन किंमती २०५/–रु असा एकुण २,७०५/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १२/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१, तीन सिटर वाहनाकरीता ०८ ईतर वाहनांवरती – ८० केसेस करण्यात आले आहे.

(पोनी. एस.टी. घुसर )
स्थागुशा भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६१९१९१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.